# बदलती समाजव्यवस्था आणि कृषी पर्यटन





जसजशी भारतातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढेल, पाश्चिमात्य संस्कृतीची आपल्या समाजावर पकड घट्ट होईल तसतसे प्रश्न वाढत जाणार आहेत. हे लक्षात घेता, ज्येष्ठ नागरिकांचे आर्थिक परावलंबित्व, सामाजिक समस्या, आरोग्यविषयक समस्या, सामाजिक सुरक्षेचा प्रश्न आणि दोन पिढ्यांतील विचारांत वाढत असलेली दरी यामुळे त्यांचा उतारवयातील प्रवास हा चांगला होण्यासाठी प्रयत्न करावेच लागतील. या दृष्टिकोनातून कृषी पर्यटन केंद्रांच्या माध्यमातून त्यांना सुखावह निवारा मिळवून देण्याचा विचार करता येईल.

एकविसाव्या शतकामध्ये समाजव्यवस्था झपाट्याने बदलत आहे. शहरीकरण व औद्योगीकरणामुळे ग्रामीण समाज शहराकडे स्थलांतरित होत आहे. जगामध्ये १९६० साली ६७ टक्के समाज गावामध्ये राहात होता, आज हे प्रमाण फक्त ४४ टक्के आहे. चीनसारख्या जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशामध्ये फक्त ३९ टक्के समाज गावात राहातो. भारतासारख्या खंडप्राय देशाचा विचार केला तर १९०१ मध्ये ८८ टक्के समाज खेड्यात राहात होता. त्याचे प्रमाण आज ५८ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे आणि पुढील ३० वर्षांत, म्हणजेच २०५० मध्ये ४७.२ टक्के समाज गावामध्ये तर ५२.८ टक्के समाज शहरामध्ये राहणार आहे. भारताची २०५० मध्ये लोकसंख्या असेल १६५ कोटी, ज्यापैकी ८७ कोटी समाज शहरामध्ये तर ७८ कोटी समाज गावामध्ये राहणार आहे. लोकसंख्या वाढत असताना दुसरीकडे अनेक प्रश्न निर्माणही होत आहेत. आज भारत जगातील सर्वात तरुण देश असून सरासरी वय २९ आहे. चीन आणि अमेरिका यांच्या समाजाचे सरासरी वय ३७ आहे तर युरोप (४५) आणि जपान (४८) याप्रमाणे सरासरी वय आहे.

पुढील तीस वर्षांत प्रगत देशांमध्ये ८० टक्के लोकसंख्या ही ज्येष्ठ नागरिक म्हणून ओळखली जाईल. खरे तर २१ व्या शतकात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढणे हे एक जागतिक आव्हान आहे. जगामध्ये एकूण लोकसंख्या- ज्येष्ठ नागरिक यांचे प्रमाण ११:१ आहे. हेच प्रमाण २०५० मध्ये ५:१ होईल. भारताचा विचार केला तर २०११ मध्ये १३.८० कोटी ज्येष्ठ नागरिक होते. या प्रमाणात २०३१ मध्ये १९.४० कोटींपर्यंत वाढ होईल.

**शहरांमध्ये लोकसंख्येची घनता वाढतेय**

या सर्व आकडेवारीवरून एक लक्षात येते की आपल्या देशातील समाजव्यवस्था मोठ्या प्रमाणात बदलत आहे. ग्रामीण भागातील समाज नोकरी, व्यवसाय किंवा चांगल्या सोयीसुविधांसाठी शहराकडे जात आहे. त्यामुळे शहरे फुगत चालली आहेत. शहरातील सर्व सोयी-सुविधांवर यामुळे मोठ्या प्रमाणात ताण वाढत चालला आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे याच शहरांमध्ये स्थायिक झालेल्या किंवा नोकरीनिमित्त शहरांमध्ये स्थायिक होणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढत आहे. महागाई वाढत आहे, शहरात राहाण्याचा खर्च वाढत आहे, त्यामुळे जास्त काम करावे लागते, जास्त पैसे कमविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. घरातील नवरा- बायकोला नोकरी करून किंवा काहीतरी व्यवसाय करून आपल्या संसाराचा गाडा पुढे नेण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. आज एकत्रित कुटुंब पद्धती लोप पावत चालली आहे. लहान कुटुंबातील 'हम दो- हमारे दो' छान वाटते- जोपर्यंत 'हमारे दो' मोठे होत नाहीत! ज्यावेळी 'हमारे दो' मोठे होतात त्यावेळी 'हम' हे ज्येष्ठ नागरिक झालेले असतात! आता प्रश्न येतो ज्येष्ठ नागरिकांना सांभाळण्याचा. बव्हंशी ज्येष्ठ नागरिकांकडे पैसा असतो, परंतु अनेकदा त्यांना त्यांच्या मनासारखे राहाता येत नाही. एका सर्व्हेनुसार ६० टक्के ज्येष्ठ नागरिक त्यांच्या कुटुंबामध्ये आनंदी नाहीत. ते कुटुंबाच्या वागणुकीमुळे वैतागले आहेत. परंतु त्यांच्याकडे दुसरा पर्याय नाही. ३९ टक्के ज्येष्ठ नागरिक स्वतंत्र राहतात परंतु शेवटच्या काळात त्यांना फारच वाईट परिस्थितीला तोंड द्यावे लागते. शहरापेक्षा गावाकडील परिस्थिती फारच गंभीर आहे.



**'ज्येष्ठत्व' नकोसं वाटणं श्रेयस्कर नाही!**

शहरामध्ये तरी ज्येष्ठ नागरिकाने स्वतंत्र राहाण्याबद्दल यावर चर्चा होत नाही परंतु गावाकडे याबाबत जास्त चर्चा होत असल्यामुळे समाजाच्या लाजेपोटी ज्येष्ठ नागरिक अनेकदा मनाविरुद्ध एकत्रित राहतात. आयुष्यभर कुटुंबाचा बैलासारखा गाडा ओढून ज्येष्ठ नागरिक झाल्यानंतर घरामध्ये कशीही वागणूक मिळाली तरी राहणे क्रमप्राप्त आहे. हा सामाजिक विचार करूनच माणूस

शेवटचे दिवस मोजतो. खरं तर इतकं वाईट असतं का? किंवा असावं का हे ज्येष्ठ नागरिक पद? त्यातल्या त्यात भारतातील ज्येष्ठ नागरिक म्हणजे अग्निपरीक्षाच! भारत सरकारने २००७ मध्ये 'मेन्टेनन्स ॲण्ड वेल्फेअर ऑफ पॅरेन्टस् ॲण्ड सिनिअर सिटीझन्स' कायदा लागू केला. तसेच २०११ मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय योजना तयार करून त्यासाठी विविध योजना सुरू केल्या. परंतु याचा आजही पाहिजे त्या प्रमाणात लाभ होत नाही. एक तर आपल्या देशात वृद्धाश्रम हा शब्दच चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आला आहे- ज्याला कोणी सांभाळत नाही, घराच्या बाहेर काढून दिले, रस्त्यावर आला, राहायची- खायची सोय नाही अशा वृद्धांना आश्रय देणारा तो म्हणजे वृद्धाश्रम! यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना कुटुंबासोबत राहण्याची इच्छा नसताना सुद्धा ते वृद्धाश्रमामध्ये जात नाहीत. कारण समाज काय म्हणेल? 'झाकली मूठ सव्वा लाखाची' या म्हणीप्रमाणे समाजाच्या भीतीपोटी ते घराच्या बाहेर पडत नाहीत.

**'वृद्धाश्रम' हा शब्दप्रयोग असंवेदनशील**

खरं तर ज्येष्ठ नागरिकांना वृद्धाश्रमामध्ये ठेवणे ही भारताची संस्कृती नाही. पाश्चिमात्य देशांमध्ये ज्यावेळी ज्येष्ठ नागरिकांचे शरीर- मन थकायला लागते त्यावेळी ते वृद्धाश्रमाची वाट धरतात. कारण तेथे त्यांच्याच वयाचा समदु:खी समाज त्यांची वाट पाहत असतो. खरं तर आपण वृद्धाश्रम हा शब्दप्रयोगच बदलण्याची गरज आहे. देशामध्ये प्रत्येक जिल्हृयात एक वृद्धाश्रम १५० क्षमतेचा असावा या धोरणानुसार आज देशात ७२८ वृद्धाश्रमांमध्ये ९७००० क्षमता आहे. यातील ६० टक्के वृद्धाश्रम सेवाभावी संस्था नि:शुल्क तत्त्वावर चालवतात तर २० टक्के वृद्धाश्रम सशुल्क तसेच नि:शुल्क अशा दोन्ही प्रकारचे आहेत. २० टक्के वृद्धाश्रम शुल्क आकारून सर्व सेवासुविधा देतात. अर्थात वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, छंद जोपासणारे केंद्र याबद्दलची माहिती फारच कमी प्रमाणात असल्यामुळे याचा लाभ घेणारे कमी आहेत. एका सर्व्हेनुसार असे आढळून आले की एकूण ज्येष्ठ नागरिकांपैकी ४३ टक्के नागरिक स्वत:च्या कमाईवर आपले कुटुंब चालवितात.

एकूण ज्येष्ठ नागरिकांपैकी २९ टक्के ज्येष्ठ नागरिक एकटे किंवा पती- पत्नी राहतात. या सर्व बाबींचा विचार केला तर ज्येष्ठ नागरिकांसाठी भविष्यात योग्य ती उपाययोजना करावी लागेल. कारण जसजशी भारतातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढेल, पाश्चिमात्य संस्कृतीची आपल्या समाजावर पकड घट्ट होईल तसतसे प्रश्न वाढत जाणार आहेत. हे लक्षात घेता, ज्येष्ठ नागरिकांचे आर्थिक परावलंबित्व, सामाजिक समस्या, आरोग्यविषयक समस्या, सामाजिक सुरक्षेचा प्रश्न आणि दोन पिढ्यांतील विचारांत वाढत असलेली दरी यामुळे त्यांचा उतारवयातील प्रवास हा चांगला होण्यासाठी प्रयत्न करावेच लागतील. या दृष्टिकोनातून कृषी पर्यटन केंद्रांच्या माध्यमातून त्यांना सुखावह निवारा मिळवून देण्याचा विचार करता येईल.

**ज्येष्ठांची सोय; ग्रामीण अर्थचक्राला गती**

योग्य पद्धतीचा आहार, वेळेवर तसेच योग्य पद्धतीचा औषधोपचार, मनमोकळेपणाने वागणे, राहाणे, चर्चा करणे, मते मांडणे, त्यांच्या स्वभावानुसार दुसऱ्याने त्यांना समजून घेणे, फिरणे, आराम करणे, छंद जोपासणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चिंतामुक्त, नैराश्यमुक्त, निरोगी जीवन जगून 'सुखान्त' होणे हीच अपेक्षा उतारवयामध्ये असते. या सर्व बाबींवरून म्हणजेच शहरातील वाढती लोकसंख्या तसेच ज्येष्ठ नागरिकांची वाढती संख्या यांचा विचार करून ग्रामीण भारताला उभारी देण्यासाठी, कृषी पर्यटनासारखी संकल्पना राबवून त्यातून शेतकऱ्यांच्या तसेच ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात आधार देता येईल काय, याचा विचार करता येईल. तसेच शहरातील समाज विशेषत: गावातून स्थलांतरित झालेला नव- नागरी वर्ग, ज्याची आजही नाळ ग्रामीण भागाशी जोडलेली आहे त्यांना- तसेच त्यांची पुढची पिढी ज्यांना आपण जे दररोज खातो, ते नेमके कधी आणि कशा प्रकारे पिकविले जाते, याचे ज्ञान मिळवून देण्यासाठी कृषी पर्यटन किंवा ग्रामीण पर्यटनाची नक्कीच मदत होईल. अर्थात यासाठी आजची समाज व्यवस्था आणि त्यामध्ये होत असलेल्या बदलांचा गांभीर्याने विचार करून त्यावर कृती कार्यक्रम तयार करावा लागेल. कारण दोन्हीही समस्या गंभीर असल्या तरी खरं तर याच समस्यांतून पुढील विकासाच्या संधी मिळणार आहेत. अर्थात याचा सकारात्मक विचार केला तरच संधी दिसतील. अन्यथा साप सोडून भुई थोपटत बसणे अयोग्य ठरेल.

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■

# कृषी पर्यटनातून ग्रामविकासाच्या दिशेने...



शहराभोवती शेती करत असताना नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भाजीपाला, फळे, दुग्धजन्य पदार्थ अशा प्रकारच्या शेती उत्पादनांवर भर देता येईल. या प्रकारचे पीक उत्पादन घेण्यासाठी फार्म उभे राहात असताना त्याचाच कृषी पर्यटनासाठी विचार केला तर दुहेरी फायदा होईल. एक तर अशा फार्ममधून तयार झालेले शेती उत्पादन ताज्या स्वरुपात आसपासच्या ग्रामीण भागातून शहरामध्ये पाठवता येईल. या फार्मवर काम करण्यासाठी शहरामध्ये झालेले अतिरिक्त मनुष्यबळही उपलब्ध होईल.

देशामध्ये शहरीकरण वाढत असताना आर्थिक सुबत्ता आल्यामुळे पर्यटन क्षेत्रात वाढ होत आहे. जागतिक पातळीवर पर्यटन क्षेत्रात ४ टक्के वाढ होत असताना भारतात मात्र या क्षेत्रात दरवर्षी १० टक्के वाढ होत आहे. जगामध्ये भारताचा पर्यटनामध्ये पहिल्या दहा देशांमध्ये समावेश होतो. अर्थात पर्यटनामध्येही मोठा बदल होत आहे. पर्यटकांना नवनवीन ठिकाणे किंवा नवनवीन संकल्पना आवडतात, याचा विचार करून नवनवीन क्षेत्रांचा समावेश पर्यटनामध्ये होत आहे. पर्यटन आनंद मिळविण्यासाठी असले तरी त्यातून आपल्या संस्कृतीचा, ग्रामीण तसेच शेती क्षेत्राचा अभ्यास होत असेल तर आनंदासोबतच ज्ञानामध्ये नक्कीच भर पडेल. पर्यटनाला गती देण्यासाठी कृषी पर्यटनाची जोड द्यावीच लागेल, हे फार पूर्वीच अनेक देशांच्या लक्षात आले. कृषी पर्यटनावर २० व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोप तसेच उत्तर अमेरिकेमध्ये मोठ्या प्रमाणात काम सुरू झाले. भारतामध्ये पहिल्यांदा महाराष्ट्रामध्ये मालेगाव, बारामती येथे कृषी पर्यटनावर काम झाले. आजही कृषी पर्यटनामध्ये महाराष्ट्र आघाडीवर असला तरी कृषी पर्यटनाबद्दल जास्त चर्चा होताना दिसत नाही किंवा माध्यमांमध्येही याची जास्त प्रसिद्धी होत नाही.

**पर्यटनाच्या माध्यमातून शेतीला आधार**

महाराष्ट्रामधील २९ जिल्ह्यांमध्ये लहान- मोठी अशी ३२८ कृषी पर्यटन केंद्रे असून, दरवर्षी जवळ जवळ ८ लाख पर्यटक याचा लाभ घेत आहेत. अर्थात भारतासारख्या देशामध्ये किंवा महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यासाठी हा आकडा फार मोठा नाही. भारताचा विचार केला तर ६.५० लाख गावांमध्ये १४.५० कोटी शेतकरी राहतात; म्हणजेच ५८ टक्के समाज गावात राहातो. महाराष्ट्राचा विचार केला तर ४५००० गावांमध्ये १.२० कोटी शेतकरी राहतात. या शेतकऱ्यांचे प्रमाण एवढे असूनही देशाच्या एकूण सकल उत्पन्नात त्यांचा वाटा फक्त १३ टक्के आहे. म्हणजेच एवढ्या कमी उत्पन्नावर देशातील मोठ्या प्रमाणातील शेतकरी आपला उदरनिर्वाह करतात. शेती तसेच ग्रामीण क्षेत्राला आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी विविध संकल्पना किंवा योजना राबविल्या जातात. परंतु एकट्या पीक उत्पादनावर किंवा कृषिपूरक व्यवसायांवर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे शक्य होत नाही. परिणामी ग्रामीण तसेच शेती अर्थव्यवस्था अडचणीत येत आहे. अशा परिस्थितीमध्ये शेती क्षेत्राला आधार देण्यासाठी कृषी पर्यटनाला प्रोत्साहन दिले तर पर्यटन क्षेत्राला गती मिळेल. आपला देश कृषी तसेच ग्रामीण पर्यटनाला खूप अनुकूल आहे. जगातील एकूण २० कृषी हवामान विभागांपैकी १५ कृषी हवामान विभाग भारतात आहेत. जगातील एकूण ६० प्रकारच्या जमिनींपैकी ४६ प्रकारच्या जमिनी भारतात आहेत. पिकाखालील जमिनीचा विचार केला तर भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. काश्मीर ते कन्याकुमारी, कोलकाता ते मुंबई या चारही बाजूंचा विचार केला तर जैवविविधता, पशु-पक्षी, नदी-नाले, वाळवंट, बर्फवृष्टी होणारा प्रदेश यामुळे पिकांची विविधता आहे. त्याचमुळे भारताला जगाचे 'बोटॅनिकल गार्डन' असे संबोधले जाते. ही सर्व जमेची बाजू असताना आणखी दोन समस्या आणि त्या अनुषंगाने भारतात निर्माण होत आहेत. भारतामध्ये शहरीकरणाचा वेग वाढत असून, पुढील ३० वर्षांत ५२ टक्के समाज शहरात तर ४८ टक्के समाज गावात राहणार आहे. वाढते शहरीकरण ही समस्या मानण्याऐवजी कृषी पर्यटनासाठी ती संधी कशी होईल याचा विचार करावा लागेल. दुसरा विषय म्हणजे देशामध्ये वाढत असलेली ज्येष्ठ नागरिकांची संख्या. एकूण लोकसंख्येच्या २० टक्के समाज ज्येष्ठ नागरिक होईल. ही आपण केवळ शहराची किंवा देशाची समस्या न मानता, या सर्व परिस्थितीचा कृषी तसेच ग्रामीण पर्यटनासाठी हातभार लागेल काय याचा विचार केला पाहिजे.

**सहलीतून मनोरंजन आणि कृतिशील शिक्षणही**

शहरांमध्ये लोकसंख्येचा फुगा फुगत असताना शहराच्या बाजूला ५० ते १०० कि.मी.च्या परिसरामध्ये अर्बन फार्मिंगला मोठ्या प्रमाणात चालना मिळू शकते. शहरातील पाण्यावर तसेच घनकचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचा वापर शेतीसाठी करता येईल. तसेच शहराभोवती शेती करत असताना नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भाजीपाला, फळे, दुग्धजन्य पदार्थ अशा प्रकारच्या शेती उत्पादनांवर भर देता येईल. या प्रकारचे पीक उत्पादन घेण्यासाठी फार्म उभे राहात असताना त्याचाच कृषी पर्यटनासाठी विचार केला तर दुहेरी फायदा होईल. एक तर अशा फार्ममधून तयार झालेले शेती उत्पादन ताज्या स्वरुपात आसपासच्या ग्रामीण भागातून शहरामध्ये पाठवता येईल. या फार्मवर काम करण्यासाठी शहरामध्ये

झालेले अतिरिक्त मनुष्यबळही उपलब्ध होईल. या प्रकारचे फार्म कृषी पर्यटनाचा विचार करून सुरू केलेले असतील तर शहरातील नोकरदार, महिला शाळा- कॉलेजचे विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना भेटी देण्यासाठी ते उपयुक्त होईल. खरे तर पर्यटनातून पर्यटकांना काहीतरी नवीन बघायला आवडते. पर्यटन केंद्रात मनोरंजन तसेच करमणुकीचे कार्यक्रम असतील तर त्यांचा वेळ चांगला जातो. पर्यटकांना त्यांच्या बजेटमध्ये राहाण्याची सोय झाली तर प्रतिसादही चांगला मिळतो. दररोजच्या जेवणासोबत वेगळ्या पद्धतीचे जेवण मिळाले तर 'सोने पे सुहागा'. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पर्यटन करत असताना त्या ठिकाणी काहीतरी विकत घेण्यासारख्या गोष्टी म्हणजे शॉपिंग केले तर आणखीनच आनंद. या सर्व गोष्टी कृषी पर्यटनातून सहज शक्य होतात.

**पर्यटन केंद्रांचे 'नेटवर्किंग' लाभदायी ठरेल**

खरे तर ग्रामीण पर्यटन हा मोठा विषय समोर ठेवून अनेक पद्धतीने पर्यटन केंद्र उभे करता येऊ शकते. उदा. कृषी पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, नैसर्गिक पर्यटन, साहसी पर्यटन, आरोग्य पर्यटन, ग्रामीण महोत्सव पर्यटन, शेती उत्पादन महोत्सव पर्यटन यासारख्या विविध संकल्पनांवर आधारित पर्यटन केंद्रांची उभारणी झाली तर पर्यटकांनाही वेगळेपणा अनुभवता येतो. ग्रामीण पर्यटनामध्येही एक ठिकाण केंद्रस्थानी ठेवून त्याच्या आजूबाजूला विविधांगी तंत्रज्ञान, पिके, व्यवसाय, उद्योग यांच्यासोबत 'नेटवर्क' केले तर पर्यटकांना त्यांच्या इच्छेनुसार विविध बाबींचा आनंद घेता येतो. त्यांच्यासोबत राहून- ते काम करून शिक्षण घेता येते. त्यातून आनंदही मिळतो. यासाठी मुख्य केंद्रामध्येच जास्त पायाभूत सुविधा तयार करून आसपासच्या 'नेटवर्क'द्वारे केंद्रांमध्ये लहान स्वरुपात परंतु वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबविता येतात. अशा प्रकारचे सामुदायिक ग्रामीण पर्यटन केंद्र मोठ्या गावामध्ये सुरू करून पर्यटकांना आकर्षित करता येईल. या प्रकारच्या पर्यटन केंद्राचा उपयोग शहरी भागातील सर्वच स्तरातील समाजाला होईल. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांची वाढती संख्या आणि त्याबरोबरच निर्माण होणारे प्रश्न यांचा विचार केला तर अशा पर्यटन केंद्रामध्येच ज्येष्ठ नागरिकांना कायमस्वरुपी किंवा काही ठराविक कालावधीसाठी राहाण्याची सोय करता येईल. शहरामध्ये त्यांच्या दैनंदिन खर्चापेक्षा निश्चितच अशा कृषी पर्यटन केंद्रामध्ये खर्च कमी असेल. नागरी भागातील इतर पर्यटनप्रेमींना शेतमाल कधी आणि कशा प्रकारे पिकविला जातो याचे ज्ञान मिळविण्यासाठी कृषी पर्यटन किंवा ग्रामीण पर्यटनाची नक्कीच मदत होईल. अर्थात यासाठी आजची समाज व्यवस्था आणि त्यामध्ये होत असलेल्या बदलांचा सांगोपांग विचार करावा लागेल. या विषयीच्या धोरण निश्चितीतून कृषी- पर्यटन विकास, ग्रामविकास आणि समग्र सामाजिक स्वास्थ्य एकाच वेळी साध्य करता येईल.

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**

■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**